RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक २२] गुरुवार, फेब्रुवारी १५, २०२४/माघ २६, शके १९४५ [पृष्ठे १३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ७१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२४.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीआरएल-०५२३/प्र.क्र.१२३(१)/राउशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती नियम, १९६६ मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतुद केल्याप्रमाणे व पूर्व प्रसिद्धीशिवाय हे नियम तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ग) आणि खंड (ज १) च्या उप खंड (२) व (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती नियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना "महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती (सुधारणा) नियम, २०२४" असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती नियम, १९६६ मधील नियम २ च्या

(अ) खंड (ix-a) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येत आहे, तो असा :—

"(ix-b) 'क्राफ्ट बीअर' म्हणजे अशी बीअर जी मायक्रो-ब्रुव्हरी किंवा एखाद्या रेस्टॉरंट-ब्रुव्हरी मध्ये निर्मित झालेली असेल आणि अशी बीअर सुयोग्य अन्न घटक वापरुन स्वादयुक्त करता येईल तथापि, त्यात साखर किंवा कृत्रिम स्वाद वापरता येणार नाही. सदरच्या बीअरचे निर्जंतुकीकरण केलेले असावे किंवा नसावे व ती कास्क, केग, बाटली, कॅन व ग्राउलर मध्ये विकता येऊ शकेल आणि ज्याची मद्यार्क तिव्रता १४ प्रुफ स्पिरीट किंवा ८% v/v पेक्षा जास्त नसेल "

(ब) मायक्रो-ब्रुव्हरीशी संबंधित खंड (xxi-a) वगळण्यात येत आहे.

(क) मीड-वाईनशी संबंधित खंड (xxi-a) च्या नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येत आहे, तो असा—

"(xxi-b) ' मायक्रो-ब्रुव्हरी ' म्हणजे अशी इमारत किंवा जागा ज्यामध्ये वार्षिक पंधरा लाख लिटर क्षमतेपर्यंत क्राफ्ट बीअरची निर्मिती करता येईल व त्यातील प्रत्येक अशी जागा ज्यात क्राफ्ट बीअर साठविली जाईल आणि ती अशा व्यक्तींना सुद्धा विकता येईल ज्यांच्याकडे मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ किंवा विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती नियम, १९५२ अंतर्गत मंजूर किरकोळ मद्यविक्रीच्या अनुज्ञप्त्या असतील, ज्याठिकाणी बीअरची खुल्या किंवा सीलबंद स्वरुपात विक्री करता येते.

(ड) खंड "(xxii-a) ऐवजी खालीलप्रमाणे खंड अंर्तभूत करण्यात येत आहे, तो असा :—

" (xxii-a) ' रेस्टॉरंट ब्रुव्हरी' म्हणजे अशी जागा जी, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ किंवा विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती नियम, १९५२ अंतर्गत मंजूर किरकोळ मद्यविक्रीच्या अनुज्ञप्त्या, ज्या ठिकाणी क्राफ्ट बीअर खुल्या स्वरुपात विक्रीस अनुज्ञेय असेल, अशा अनुज्ञप्तीच्या जागेशी संलग्न असेल किंवा त्या अनुज्ञप्तीचा भाग असेल, तथापि ज्याची उभारणी स्वतंत्ररित्या वार्षिक पंधरा लाख लिटर क्षमतेपर्यंत क्राफ्ट बीअर उत्पादन करण्याकरिता असेल आणि ज्या जागेचा समावेश क्राफ्ट बीअर साठविण्यासाठी केला जाईल व त्याची विक्री त्याच ठिकाणी खुल्या/सुट्या स्वरुपात (बाटलीबंद किंवा पॅकबंद नसलेल्या) करण्यात येईल आणि ती अशा व्यक्तींना सुद्धा विकता येईल ज्यांच्याकडे मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ किंवा विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती नियम, १९५२ अंतर्गत मंजूर किरकोळ मद्यविक्रीच्या अनुज्ञप्त्या असतील, ज्या ठिकाणी बीअरची खुल्या किंवा सीलबंद स्वरुपात विक्री करता येते.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रविंद्र औटे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 15th February, 2024.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. BRL-0523/C.R.123(1)/Excise-3.—Whereas the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Maharashtra Manufacture of Beer and Wine Rules, 1966, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949).

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (c), sub-clauses (*ii*) and (v) of clause (h1) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Manufacture of Beer and Wine Rules, 1966, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Manufacture of Beer and Wine (Amendment) Rules, 2024.

2. In Rule 2 of the Maharashtra Manufacture of Beer and Wine Rules, 1966,—

(*a*) after clause (*ix-a*), the following clause shall be inserted, namely :—

"(*ix-b*) *'Craft Beer'* means Beer manufactured in a micro-brewery or a restaurant-brewery and maybe aromatised with suitable food ingredients, but, without addition of sugar or synthetic flavours. It may or may not be pasteurised, and may be sold in casks, kegs, bottle, cans or growlers and having alcoholic strength not exceeding 14 proof spirit or 8 per cent. v/v";

(*b*) clause (xxi-a) relating to Micro-brewery shall be deleted ;

(*c*) after clause (xxi-a) relating to mead wine, the following clause shall be inserted, namely—

"(xxi-b) 'Micro-brewery' means a building or place where Craft Beer is manufactured, having capacity of fifteen lakh litres per annum and includes every place therein where craft beer is stored and when it is issued for sell also to the person holding retail licences appended to the Bombay Foreign Liquor Rules, 1953 or Special Permits and Licences Rules, 1952 wherein Beer is allowed to be sold either for 'on' or 'off' consumption directly." ;

(*d*) for clause (*xxii-a*) the following clause shall be substituted as under, namely :—

"(xxii-a) 'Restaurant-brewery' means a place adjacent to or a portion of premises of a licence appended to the Bombay Foreign Liquor Rules, 1953 or Special Permits and Licences Rules, 1952 wherein Craft Beer is allowed to be sold 'on' consumption, which is set apart for the manufacture of such beer, having capacity of fifteen lakh litres per annum and includes every place therein where Craft Beer is stored and when it is issued for sell either on-site in un-bottled and unpacked form or also to the persons holding retail licences appended to the Bombay Foreign Liquor Rules, 1953 or Special Permits and Licences Rules, 1952 wherein Beer is allowed to be sold either for 'on' or 'off' consumption directly."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAVINDRA AUTE,
Deputy Secretary to Government.

## गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२४

### अधिसूचना

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीआरएल-०५२३/प्र.क्र.१२३(२)/राउशु-३.—ज्याअर्थी, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करून पुढील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, (१९४९ चा २५ वा) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धीशिवाय हे नियम तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना " मुंबई विदेशी मद्य ( दुसरी सुधारणा) नियम, २०२४" असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ (यापुढे यास "प्रधान नियम" असे संबोधण्यात यावे) मधील नियम ३ च्या खंड (६) च्या उप खंड (१) मधील नोंद (५) नंतर खालीलप्रमाणे नोंद अंर्तभूत करण्यात येत आहे, ती अशी :—

"(६) क्राफ्ट बीअर, महाराष्ट्र बीअर व वाईन निर्मिती नियम, १९६६ मध्ये करण्यात आलेल्या व्याख्येनुसार "

३. प्रधान नियमातील नियम ३० मध्ये दुसऱ्या परंतुकात "५ लिटर पेक्षा कमी नाही" हे शब्द व आकडे वगळण्यात येत आहेत.

४. प्रधान नियमातील नियम ५० मध्ये तिसऱ्या परंतुकात "५ लिटर पेक्षा कमी नाही" हे शब्द व आकडे वगळण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रविंद्र औटे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 15th February, 2024.

*NOTIFICATION*

Maharashtra Prohibition Act.

No. BRL-0523/C.R.123(2)/Excise-3.—Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act, 1949 and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, as follows, namely :—

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor (Second Amendment) Rules, 2024.

2. In Rule 3 of the Bombay Foreign Liquor Rules, 1953 (hereinafter referred to as "the principal rules"), in clause (*6*), in sub-clause (*1*), after entry (*v*), the following entry shall be added, namely:-

"(*vi*) Craft Beer as defined in the Maharashtra Manufacture of Beer and Wine Rules, 1966.".

3. In Rule 30 of the principal Rules, in the second proviso, the words and figures "of not less than 5 litres" shall be deleted.

4. In Rule 50 of the principal Rules, in the third proviso, the words and figures "of not less than 5 litres" shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAVINDRA AUTE,
Deputy Secretary to Government.

## गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२४

### अधिसूचना

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीआरएल-०५२३/प्र.क्र.१२३(३)/राउशु-३.—महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) मधील कलम १०५ च्या पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट शासन, याद्वारे शासन अधिसूचना, गृह विभाग क्र. एआरएम १०९६/२१/२/इएक्ससी-३, दिनांक १३ सप्टेंबर, १९९६ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे, ते असे :—

उक्त अधिसूचनेतील सूचीमध्ये :—

(i) नोंद ४ ऐवजी खालीलप्रमाणे नोंद वाचण्यात यावी, ती अशी :—

| | | |
|---|---|---|
| ४. | मायक्रो-ब्रुव्हरी किंवा रेस्टॉरंट-ब्रुव्हरी मध्ये निर्मित होणारी क्राफ्ट बीअर | रु.६०/- प्रति बल्क लिटर |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रविंद्र औटे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 15th February, 2024.

*NOTIFICATION*

Maharashtra Prohibition Act.

No.BRL-0523/C.R.123(3)/Excise-3.—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 105 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949), the Government of Maharashtra hereby amends, the Government Notification, Home Department, No. ARM 1096/21/2/EXC-3, dated the 13th September 1996, as follows, namely :—

In the said notification, in the SCHEDULE, for entry 4, the following entry shall be substituted, namely :—

| | | |
|---|---|---|
| "4. | Craft Beer manufactured at a micro-brewery or a restaurant-brewery | Rs. 60 per bulk litre" |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAVINDRA AUTE,
Deputy Secretary to Government.

## गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२४

### अधिसूचना

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीआरएल-०५२३/प्र.क्र.१२३(४)/राउशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र पेय मद्य (किरकोळ विक्रीची कमाल किंमत निर्धारण) नियम, १९९६ मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतुद केल्याप्रमाणे व पूर्व प्रसिद्धीशिवाय हे नियम तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ज १) च्या उपखंड (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे महाराष्ट्र पेय मद्य (किरकोळ विक्रीची कमाल किंमत निर्धारण) नियम, १९९६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना "महाराष्ट्र पेय मद्य (किरकोळ विक्रीची कमाल किंमत निर्धारण) (सुधारणा) नियम, २०२४" असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र पेय मद्य (किरकोळ विक्रीची कमाल किंमत निर्धारण) नियम, १९९६ मधील नियम ५ च्या खंड (अ) च्या उप खंड (iii)

(i) मधील नोंद (e) ऐवजी खालीलप्रमाणे नोंद अंर्तभूत करण्यात येत आहे, ती अशी :—

"(e) मायक्रो-ब्रुव्हरी किंवा रेस्टॉरंट-ब्रुव्हरी मध्ये निर्मित झालेली क्राफ्ट बीअर ज्याची मद्यार्क तीव्रता १४ प्रुफ स्पिरिट किंवा ८% v/v पेक्षा जास्त नसेल यासाठी निर्मिती मुल्याच्या ४ पट अधिक प्रचलित दराने विक्रीकर "

(ii) मधील नोंद (f) वगळण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रविंद्र औटे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 15th February, 2024.

*NOTIFICATION*

Maharashtra Prohibition Act.

No. BRL-0523/C.R.123(4)/Excise-3.—Whereas the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Maharashtra Potable Liquor (Fixation of Maximum Retail Prices) Rules, 1996 should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949).

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-clause (*ii*) of clause (*h1*) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Potable Liquor (Fixation of Maximum Retail Prices) Rules,1996, as follows, namely :—

1. These rules may be called Maharashtra Potable Liquor (Fixation of Maximum Retail Prices) (Amendment) Rules, 2024.

2. In Rule 5 of the Maharashtra Potable Liquor (Fixation of Maximum Retail Prices) Rules, 1996, in clause (A), in sub-clause (*iii*),—

(*i*) for entry (*e*), the following entry shall be substituted, namely :—

"(*e*) 4 times the manufacturing cost in case of Craft Beer manufactured in a micro-brewery or a restaurant-brewery having alcoholic strength not exceeding 14 proof spirit or 8 per cent. v/v plus Sales tax at the prevalent rate;";

(*ii*) entry (*f*) shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAVINDRA AUTE,
Deputy Secretary to Government.

## गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२४

### अधिसूचना

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीआरएल-०५२३/प्र.क्र.१२३(५)/राउशु-३.—ज्याअर्थी, विशेष परवाने आणि अनुज्ञप्त्या नियम, १९५२ मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे व पूर्व प्रसिद्धीशिवाय हे नियम तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून , महाराष्ट शासन, याद्वारे विशेष परवाने आणि अनुज्ञप्त्या नियम, १९५२ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना "विशेष परवाने आणि अनुज्ञप्त्या नियम, १९५२ (सुधारणा) नियम, २०२४" असे संबोधण्यात यावे.

२. विशेष परवाने आणि अनुज्ञप्त्या नियम, १९५२ (यापुढे यास "प्रधान नियम" असे संबोधावे.) मधील नियम ५

*(i)* च्या उपनियम (१) मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

*(ii)* च्या उपनियम (३), च्या खंड (अ) मधील उप-खंड (*ii*) मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

*(iii)* च्या उपनियम (५) मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

*(iv)* च्या उपनियम (७) मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

*(v)* च्या उपनियम (८) मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

*(vi)* च्या उपनियम (९),—

*(a)* मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

*(b)* स्पष्टीकरण १ आणि २ ऐवजी पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल.

"**स्पष्टीकरण १**–या नियमांमध्ये "सौम्य मद्य" म्हणजे ८.७५ प्रुफ स्पिरिट पेक्षा अधिक मद्यार्क तीव्रता नसलेली सौम्य बिअर (५%v/v समतुल्य).

**स्पष्टीकरण २**–या नियमांमध्ये "किण्वित मद्य" म्हणजे ८.७५ प्रुफ स्पिरिट पेक्षा अधिक परंतु १४ प्रुफ स्पिरिट पेक्षा अधिक मद्यार्क तीव्रता नसलेली तीव्र बिअर (८%v/v समतुल्य).

**स्पष्टीकरण ३**–या नियमामध्ये "क्राफ्ट बीअर आणि वाईन" म्हणजे महाराष्ट्र बिअर व वाईन निर्मिती नियम,१९६६ च्या नियम २ मधील अनुक्रमे खंड (ix-a) आणि (xxvii) मधील व्याख्येनुसार "क्राफ्ट बीअर आणि वाईन". "

(*vii*) च्या उपनियम (१०)—

(*i*) च्या खंड (अ) मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

(*ii*) च्या खंड (ब) मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

(*iii*) च्या खंड (क) मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

३. प्रधान नियमांना जोडलेल्या नमुना 'ड' च्या शीर्षकामधील "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

४. प्रधान नियमांना जोडलेल्या नमुना 'इ' च्या—

(*i*) शीर्षकामधील "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

(*ii*) "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

(*iii*) अनुज्ञप्ती शर्त क्रमांक १ मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

(*iv*) अनुज्ञप्ती शर्त क्रमांक २ मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

(*v*) अनुज्ञप्ती शर्त क्रमांक ३ मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

(*vi*) अनुज्ञप्ती शर्त क्रमांक ४ मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

(*vii*) अनुज्ञप्ती शर्त क्रमांक ५(ब) मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

(*viii*) अनुज्ञप्ती शर्त क्रमांक १० मध्ये "सौम्य मद्य किंवा वाईन किंवा दोन्ही" या शब्दांऐवजी "सौम्य मद्य, किण्वित मद्य, क्राफ्ट बीअर आणि वाईन किंवा यापैकी कोणतेही" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रविंद्र औटे,**
शासनाचे उप सचिव.

**HOME DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 15th February, 2024.

*NOTIFICATION*

Maharashtra Prohibition Act.

No. BRL-0523/C.R.123(5)/Excise-3.—Whereas the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Special Permits and Licences Rules, 1952, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949).

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (b) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Special Permits and Licences Rules, 1952, as follows, namely :—

1. These rules may be called the Special Permits and Licences (Amendment) Rules, 2024.

2. In Rule 5 of the Special Permits and Licences Rules, 1952 (hereinafter referred to as "the principal rules"),—

(*i*) In sub-rule (*1*), for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

(*ii*) In sub-rule (*3*), in clause (a), in sub-clause (ii), for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

(*iii*) In sub-rule (*5*), for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

(*iv*) In sub-rule (*7*), for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

(*v*) In sub-rule (*8*), for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

(*vi*) In sub-rule (*9*),—

(*a*) for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted.

(*b*) for the explanation I & II the following shall be substituted, namely :—

"*Explanation I*–In this rule "Mild Liquor" means mild beer having alcoholic strength not exceeding 8.75 proof spirit (equivalent to 5%v/v).

*Explanation II*–In this rule, "Fermented Liquor" means strong beer having alcoholic strength exceeding 8.75 proof spirit but not exceeding 14 proof spirit (equivalent to 8%v/v).

*Explanation III*–In this rule, "Craft Beer" and "wines" means "Craft Beer" and "Wines" as defined in clauses (*ix-a*) and (*xxvii*) of rule 2 of the Maharashtra Manufacture of Beer and Wine Rules, 1966, respectively.";

(*vii*) In sub-rule (10),—

(*i*) In clause (A), for the words "mild liquor or wines or both", the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

(*ii*) In clause (B), for the words "mild liquor or wines or both", the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted;

(*iii*) In clause (C), for the words "mild liquor or wines or both", the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

3. In Form D appended to the principal Rules, in the heading, for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

4. In Form E appended to the principal Rules,—

(*i*) in the heading, for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

(*ii*) for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

(*iii*) in condition no.1, for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

(*iv*) in condition no.2, for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

(*v*) in condition no.3, for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

(*vi*) in condition no.4, for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

(*vii*) in condition no.5(b), for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

(*viii*) in condition no.10, for the words "mild liquor or wines or both" the words "mild liquor, fermented liquor, craft beer and wines or any of these" shall be substituted ;

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAVINDRA AUTE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.